सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १४९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. ७ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## हिमाचलमध्ये ढगफुटी, ७८ जणांचा मृत्यू
## अनेक ठिकाणी दरड कोसळून ३७ बेपत्ता; २५० रस्ते बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७सिमला**

हिमाचल प्रदेश एकाच वेळी अनेक नैसर्गिक आव्हानांचा सामना करत आहे. अनेक ठिकाणी दरड कोसळल्याच्या घटना समोर आल्या आहेत, रस्ते खचले आहेत, अनेक जिल्ह्यांमध्ये ढगफुटी झाली असून नद्यांना महापूर आला आहे. मुसळधार पावसामुळे सगळीकडे भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी दरड कोसळून काही ठिकाणी माणसं मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकली आहेत. ढगफुटीपासून ते भूस्खलनापर्यंत आणि नद्यांच्या प्रलयंकारी पूरापर्यंत, या नैसर्गिक आपत्तींमुळे हजारो कोटी रुपयांचं नुकसान झालं आहे. त्याचबरोबर मोठी जीवितहानी देखील झाली आहे. निसर्गाच्या या भयावह रुपासमोर सगळेच हतबल झाल्याचं पाहायला मिळत आहे.

२०२३ मधील मुसळधार पावसामुळे राज्यात झालेली जीवितहानी लोक अजून विसरले नाहीत. दोन वर्षांपूर्वी पूर व भूस्खलनामुळे राज्यात ४०० हून अधिक लोकांचा बळी



गेला होता. त्या भयावह आठवणी अजून ताज्या असतानाच पुन्हा एकदा राज्यात तशीच स्थिती निर्माण झाली आहे. अजून राज्याच्या सर्व भागात मान्सून दाखल झालेला नाही. त्याआधीच ठिकठिकाणी मोठमोठी नैसर्गिक संकटं उभी राहिली आहेत. त्यामुळे मान्सून पूर्णपणे राज्यात दाखल होईल तेव्हा काय स्थिती असेल या विचारानेच लोक घाबरले आहेत.

राज्यात मुसळधार पाऊस, नद्यांना आलेला पूर व दरड कोसळून आतापर्यंत ७८ लोकांचा जीव गेला आहे. तसेच ३७ जण बेपत्ता आहेत. यासह ११५ जण जखमी असून त्यांच्यावर उपचार चालू आहे.मुसळधार पावसामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांमधील जनजीवन विस्कळीत झालं आहे. दोन राष्ट्रीय महामार्गांसह २५० हून अधिक रस्ते बंद आहेत. वीजेचे २७८ ट्रान्सफॉर्मर्स बंद पडले आहेत. यासह २६१ जलप्रकल्प बंद आहेत. थुनांग येथील एका सहकारी बँकेचं कार्यालय वाहून गेलं आहे. थुनांग भागात ही एकमेव बँक होती. येथील लोकांचे आर्थिक व्यवहार या बँकेवर अवलंबून होते. मात्र, त्या बँकेचं कार्यालय वाहून गेल्यामुळे मोठं आर्थिक नुकसान झालं आहे. यासह मोठी वित्तहानी देखील झाली आहे.

मुसळधार पावसामुळे अनेक लहान-मोठ्या नद्यांना पूर आला आहे. ज्यामुळे लोकांच्या घरांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. तर, हवामान विभागाने सिरमौर, कांगडा, मंडी या तीन जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी केला आहे. तर, शिमला, सोलन, हमीरपूर, बिलासपूर ऊना, कुल्लू व चम्बा या सात जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे.

## ठाकरेंनी पहिलं आपल्या खासदारांना मराठी शिकवावं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**


उद्धव ठाकरे यांनी मुंबई महापालिका निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन भाषण केल्याची टीका शिवसेना शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी केली. उद्धव ठाकरे हे हारलेले दिसून आले. राज ठाकरे आमच्याबद्दल काही बोलले नाहीत म्हणून आम्ही त्यांच्याबद्दल काही बोलणार नाही. मात्र उद्धव ठाकरे यांच्याबद्दल आम्ही बोलत राहू असे म्हस्के म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी अतिशय गलिच्छ पद्धतीने भाषण करुन उसन अवसान आणल्याची टीका म्हस्के यांनी केली. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाची खासदार प्रियंका चतुर्वेदी दोन ओळीही मराठीत बोलू शकत नाही. त्यामुळं उद्धव ठाकरेंना मराठीविषयी बोलण्याचा काय अधिकार ?र असा सवालही म्हस्के यांनी केला. उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी प्रथम आपल्या खासदाराला मराठी शिकवावं, मग मराठीचा पुळका आणावा अशा शब्दात म्हस्केंनी निशाणा साधला.

## हो मी पाकिस्तानी सैन्याचा एजंट होतो, तहव्वूर राणाने चौकशीमध्ये केले अनेक धक्कादायक गौप्यस्फोट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

सुमारे १७ वर्षांपूर्वी २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईत झालेल्या आत्मघाती दहशतवादी हल्ल्यामुळे संपूर्ण देश हादरला होता. दरम्यान, या हल्ल्यातील प्रमुख सूत्रधारांपैकी एक असलेल्या तहव्वूर राणा याला भारतात आणण्यात सुरक्षा यंत्रणांना यश आलं होतं. सध्या एनआयएच्या कोठडीत असलेल्या तहव्वूर राणाची मुंबई पोलिसांच्या क्राईम ब्रँचने नुकतीच कसून चौकशी केली. या चौकशीदरम्यान, तहव्वूर राणा याने अनेक धक्कादायक गौप्यस्फोट केले आहेत. मी पाकिस्तानी सैन्याचा विश्वासू हस्तक होतो, तसेच आखाती युद्धादरम्यान, मला सौदी अरेबियामध्ये तैनात करण्यात आले होते, असे त्याने सांगितले.

कॅनेडियन नागरिक असलेल्या तहव्वूर राणाचं एप्रिल महिन्यात अमेरिकेमधून भारताकडे प्रत्यार्पण करण्यात आलं होतं. तहव्वूर राणा याने चौकशीदरम्यान सांगितले की, मुंबईमध्ये २०८ साली दहशतवादी हल्ल्यापूर्वी मी मुंबईतील अनेक महत्त्वपूर्ण ठिकाणांची रेकी केली होती. तसेच इमिग्रेशन बिझनेसच्या माध्यमातून डेव्हिड हेडली याला मुंबईमध्ये एक बनावट कार्यालय



उघडण्यास मदत केली होती. त्याचा वापर मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा कट रचण्यासाठी केला होता, असेही राणा याने सांगितले.

दरम्यान, एनआयएमधील सूत्रांनी सांगितले की, लष्कर ए तोयबा आणि पाकिस्तानच्या आयएसआय या गुप्तचर यंत्रणेमध्ये असलेलं साटंलोटं तहव्वूर राणा याने उघड केलं आहे. २००५ मी पाकिस्तानमधील दहशतवाद्यांच्या म्होरक्यांसोबत मिळून मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा कट आखत होतो, अशी माहिती त्याने दिली. दरम्यान, डेव्हिड हेडली आणि त्याच्यामध्ये झालेली ई-मेलची देवाणघेवाण, प्रवासाचे तपशील आणि इतर पुराव्यांचं विश्लेषण केलं जात आहे.

## ३६० ठिकाणी केबल कार व रोपवे
## गडकरींची दुर्गम भागांसाठी नवी योजना

### गावागावात रोपवे, शहरात हायपरलूप! : वाहतुकीत बदल घडवणारी योजना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नागपूर**

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी देशातील पुढच्या पिढीच्या वाहतुकीसाठी एक महत्त्वाकांक्षी रूपरेषा तयार केली आहे. यामध्ये शहरी भागात इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्सपोर्ट, हायपरलूप, तर दुर्गम भागांसाठी रोपवे, केबल बस आणि फनिक्युलर रेल्वेचा समावेश आहे.

गडकरी म्हणाले की, भारतातील वाहतूक क्षेत्र एका मोठ्या बदलातून जात आहे. ११ प्रमुख वाहन उत्पादकांकडून ट्री बैंक, मोबाइल-आधारित



ड्रायव्हिंग टेस्ट आणि फ्लेक्स-फ्युएल इंजिनसारखे उपक्रम पाइपलाइनमध्ये आहेत. याशिवाय, २५,००० किमी लांबीच्या दोन पदरी महामार्गाचे चार पदरीमध्ये रूपांतर करणे, प्रमुख मार्गावर इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्सपोर्ट नेटवर्क उभारणे आणि दररोज १०० किमी रस्ते बांधकाम वाढवणे यावर मंत्रालय काम करत आहे. आम्ही नवीन उपक्रमांना प्रोत्साहन देत आहोत. सार्वजनिक वाहतूक क्षेत्रात क्रांती घडत आहे, असे गडकरी म्हणाले.

भारतामधील प्रवासाचा अनुभव बदलण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू आहे. याअंतर्गत, केवळ महानगरांवरच नव्हे तर दुर्गम ग्रामीण भागांवरही लक्ष केंद्रित केले जात आहे. आम्ही केदारनाथसह ३६० ठिकाणी रोपवे, केबल कार आणि फनिक्युलर रेल्वे बांधत आहोत. यापैकी ६० प्रकल्पांवर काम सुरू झाले आहे, असे गडकरी म्हणाले.

इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्सपोर्टसाठी नागपूरमध्ये १३५ सीट असलेल्या इलेक्ट्रिक बससाठी निविदा काढण्यात आली आहे.या बसमध्ये एसीसह विमानाच्या दर्जाच्या सुविधा असतील आणि तिचा वेग १२०-१२५ किमी प्रतितास असेल. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी रविवारी इस्रायल-इराण व रशिया-युक्रेन युद्धांचा संदर्भ देत जागतिक परिस्थितीवर चिंता व्यक्त केली. महासत्तांच्या हुकूमशाहीमुळे समन्वय, परस्पर सौहार्द आणि प्रेम संपत आहे आणि जगभरात संघर्षाचे वातावरण आहे. या युद्धजन्य परिस्थितीमुळे कधीही तिसऱ्या महायुद्धाचा उद्रेक होऊ शकतो, असा इशाराही त्यांनी दिला.

## लाडकी बहीण योजनेवरून विरोधकांकडून अपप्रचार; मात्र जनतेने त्यांना प्रतिसाद दिला नाही - नीलम गोऱ्हे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

लाडकी बहीण योजनेविषयी विरोधक अपप्रचार करीत आहेत, अफवा पसरवत आहेत. या माध्यमातून राज्यातील महिलांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे, अशी स्पष्ट भूमिका महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मांडली.

शिवसेना शहर संघटक आनंद गोयल यांच्या पुढाकारातून येरवडा, जनतानगर नवी खडकी येथे सुरू करण्यात आलेल्या शिवसेना जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी नागरिकांसाठी छत्री वाटप आणि आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवसेना सहसंपर्कप्रमुख अजय भोसले, शहरप्रमुख प्रमोद नाना भानगिरे, शहर उपप्रमुख सुनील जाधव, महिला आघाडी संपर्कप्रमुख सुदर्शना त्रिगुणाईत, माजी नगरसेविका सुरेखा कदम उपस्थित होत्या.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील भगिनींसाठी 'लाडकी बहीण' योजना सुरू केली. या योजनेमुळे अनेक महिलांना त्यांच्या दैनंदिन खर्चात मोठी मदत मिळत आहे. मात्र, या योजनेवरून विरोधकांनी जाणीवपूर्वक खालच्या थराला जाऊन गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न केला. परंतु जनतेने त्यांच्या या अपप्रचाराला प्रतिसाद दिला नाही. विधानसभा निवडणुकीत त्यांनी याचे उत्तर दिले आहे. येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही महायुती व शिवसेनेच्या पाठीशी उभे राहा, महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रत्येक शुक्रवारी विविध कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. तसेच महिलांसाठी संगणक, माहिती पुस्तिका आणि अन्य प्रशिक्षण साहित्य खरेदीसाठी माझ्या आमदार निधीतून १० लाखांचा निधी देत आहे. या माध्यमातून अधिकाधिक महिला स्वयंपूर्ण आणि आत्मनिर्भर व्हाव्यात, असे आवाहन डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले.

## 'समृद्धी'वर १२ लाख झाडे लावण्याचा विसर, तीन वर्षांनंतरही महामार्ग ओस'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

राज्याच्या विकासाला गती देणारा हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गालगत १२ लाख झाडे लावण्याचा विसर पडला आहे. तीन वर्षे लोटली असताना पहिल्या टप्प्यात तीन लाख वृक्षांची लागवड झालेली नाही. परिणामी, 'समृद्धी'वर हिरवळ निर्माण होऊ शकली नाही. या महामार्गावर वारंवार होणारे अपघात हेसुद्धा महामार्गाच्या दोन्ही बाजू ओस पडल्याचे महत्त्वपूर्ण कारण मानले जात आहे.

नागपूर-मुंबई महामार्गावरून ७०१ किमीचा प्रवास मात्र सुसाट झालेला आहे. हा महामार्ग तयार करताना वन्यजीवांसह इतर बाबींची काळजी घेण्यात आली आहे. महामार्गावर ३० लाख झाडे लावण्याचा दावा ठोकला जात असला, तरी प्रवासादरम्यान हा दावा फोल ठरतो. 'समृद्धी'वर डिव्हायडरमध्ये झाडे लावण्यासाठी बरीच जागा



असताना त्याठिकाणी फुलझाडे, शोभिवंत झुडपे लावून महामार्गाची 'समृद्धी' झाली, असा अर्थ प्रशासनाने काढला की काय? असा सवाल आता प्रवासी उपस्थित करत आहेत.

**१२ लाख झाडांचे काय?**

१) समृद्धी महामार्गावर दोन्ही लेनच्या मधोमध ९ मीटर एवढी जागा झाडे लावण्यासाठी राखीव आहे. २) वड, पिंपळ, कडूनिंब, आंबा अशी महत्त्वाची ऑक्सिजन खेचणारी झाडे ३ मीटर अंतरावर लावली तर ३३३ प्रति किमी याप्रमाणे ४.६६ लाख झाडे लावता येतील. दुप्पट लाइनमध्ये हा आकडा ९ लाख झाडांवर पोहोचतो. याशिवाय डिव्हायडरच्या मधोमध ३ लाख झाडे लावता येतील. ३) गत तीन वर्षांत समृद्धीवर १२ लाख झाडे लावणे अपेक्षित होते. मात्र, ३ वर्षांनंतरही या महामार्गावर २ लाख झाडेही व्यवस्थित लावली गेली नाहीत. गुलमोहर, काशीद यासारखी कच्च्या लाकूड प्रजातींची झाडे लावण्यात आली आहेत.

**काही भागात नैसर्गिक हिरवळ**

इगतपुरी ते कसारा हा ७६ किमीचा समृद्धी महामार्ग नैसर्गिक हिरवळीने नटलेला आहे. या ठिकाणी वृक्ष लागवडीसाठी जागा आहे. मात्र, बुलढाणा आणि वर्धा जिल्ह्यांतून जाणाऱ्या समृद्धी महामार्गाच्या दोन्ही बाजूने जंगल असल्याने प्रवास सुखद होतो. मात्र, इतरत्र प्रवास हा भकास वाटतो.

## बोगस पीकविमा दावे करणाऱ्यां शेतकऱ्यांवर होणार कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

राज्यातील फडणवीस सरकारने एक मोठा निर्णय घेतलाय. प्रत्यक्षात ज्या शेतकऱ्यांनी बोगस पीकविमा दावे सादर केलेत आणि विम्याचा लाभ घेतलाय, त्यांना काळ्या यादीत टाकण्याची तयारी राज्य सरकार करीत आहे. राज्य कृषी विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने रविवारी सांगितले की, यापूर्वी ही कारवाई प्रामुख्याने मध्यस्थ आणि सेवा पुरवठादारांपर्यंत मर्यादित होती. पीकविमा कार्यक्रमांतर्गत फसव्या अर्जांच्या अनेक प्रकरणांना पाहता हा निर्णय घेण्यात आल्याचे अधिकाऱ्यानं अधोरेखित केले.

या संदर्भात एका अधिकाऱ्याने सांगितले की, राज्य सरकारने आता पीक विम्याचा बोगस पद्धतीनं लाभ मिळविण्यासाठी खोटे दावे सादर करणारे शेतकरी आढळल्यास त्यांना काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय घेतलाय. शेतकऱ्या अशा पद्धतीनं बोगस लाभ घेऊ नये म्हणून हा प्रतिबंधात्मक उपाय योजण्यात आलाय.

## संपादकीय ......

# विद्यार्थ्यांची गळती रोखण्याचे आव्हान

एखाद्या देशातील लाखो मुले शाळा सोडण्यास प्रवृत्त होत असतील, तर ती केवळ शैक्षणिक समस्या नाही, तर तो एकप्रकारचा सामाजिक इशारा मानावा लागेल. भारतातील सर्व ६६ शिक्षण मंडळ–२०२४ च्या परीक्षांचा निकाल चिंताजनक स्थिती सांगणारा आहे. दहावी आणि बारावीच्या वर्गातील सुमारे ५० लाख विद्यार्थी पुढच्या वर्गात गेले नाहीत. यापैकी काही जण नापास झाले, तर काही जण आर्थिक किंवा कौटुंबिक कारणांमुळे परीक्षेला बसू शकले नाहीत. अशा विद्यार्थ्यांची गळती थांबविणे आवश्यक असून ते 'विकसित भारत'साठी महत्त्वाचे आहे.

कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे शाळा सोडणार्या आणि मुख्य प्रवाहातून बाहेर पडणार्या विद्यार्थ्यांची स्थिती बिकट आहे. अशावेळी त्यांना पुन्हा या प्रवाहात कसे आणता येईल, याचा गांभीर्याने विचार करायला हवा. शिक्षण अर्धवट स्थितीत सोडणार्या मुलांची बालविवाह, बालकामगार किंवा शोषणापासून कशी मुक्ती होईल, हेही पाहिले पाहिजे. या समस्येचे मूळ कोठे आहे आणि त्यावरचा तोडगा काय? शिक्षणापासून वंचित मुलांची संख्या पाहावयाची झाल्यास शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाच्या आकडेवारीनुसार दहावीच्या परीक्षेत २२.१७ लाख विद्यार्थी नापास झाले आणि ४.४३ लाख विद्यार्थी परीक्षेला बसले नाहीत. त्याचवेळी बारावी परीक्षेत २०.१६ लाख विद्यार्थी नापास झाले आणि ४.६ लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी करूनही परीक्षा दिली नाही. म्हणजेच एकुणातच ५० लाखांहून अधिक विद्यार्थी पुढच्या वर्गात गेली नाहीत.

ही आकडेवारी पाहता एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षण सोडण्यास प्रवृत्त झाल्याचे दिसून येते. हे केवळ त्यांचे व्यक्तिगत नुकसान नाही, तर समाज आणि देशाच्या विकासासाठी एक गंभीर आव्हान आहे. शिक्षणापासून वंचित राहणारी ही मुले केवळ स्वत:चे भवितव्य अंधारात लोटत नाहीत, तर ते बालकामगार, बालविवाह, शोषण यासारख्या धोक्यांखाली वावरत असतात.

विद्यार्थ्यांची गळती होण्यामागे केवळ परीक्षेत अपयशी होणे किंवा अन्य कारणांमुळे परीक्षा न देण्यापुरतीच मर्यादित नाही, तर त्याची अन्यही काही कारणे आहेत; मात्र तेवढेच कारण पुरेसे नसून आणखी खोलवर जाण्याची गरज आहे. आजच्या शिक्षण पद्धतीत यशाचे निकष हे गुणांवर अवलंबून असणे. या दृष्टीने विद्यार्थ्यांवर मानसिक दबाव वाढतो. परिणामी, मुलांत आत्मविश्वास कमी राहतो, तणाव वाढतो, नैराश्यासारख्या समस्या उद्भवू लागतात. काहीवेळा मुले या धक्क्यातून बाहेर यते नाहीत. त्याचवेळी गरीब कुटुंबात मुलाकंडून काम करून घेतले जाते, लवकर लग्न लावणे या गोष्टी घडताना दिसतात.

आजघडीला राज्यस्तरापासून ते केंद्र सरकारच्या पातळीपर्यंत असणार्या योजना प्राथमिक शिक्षण ते उच्च शिक्षण आणि कौशल्य विकासाला चालना देतात; मात्र अनेकदा समुपदेशनाच्या अभावामुळे विद्यार्थ्यांना अपयशानंतरही योग्य मार्गदर्शन मिळत नाही. पुढे काय करावे, हे त्यांना सूचत नाही. शेवटी द्विधा मन:स्थितीत असणारे मुले चुकीच्या मार्गावर जातात. शिक्षणापासून वंचित मुले समाजकंटकांच्या संपर्कात येऊ शकतात. अशा स्थितीत शाळा सोडणारी मुले गुंडांच्या टोळ्या, अमली पदार्थांचा बाजार आणि डिजिटल शोषणाला बळी पडू शकतात. या स्थितीमुळे देशाच्या कुशल मनुष्यबळाची हानी होते. शाळा सोडणार्या मुलांचे शिक्षण कायम राहिले, तर ते स्वत:च्या पायावर उभे राहून देशाच्या विकासात योगदान देतील आणि आपण त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले नाही, तर आव्हानांच्या गर्तेत अडकलेली एक पिढी पुढे दिशाहीन होऊ शकते.




## पोटावरील चरबी भरभर कमी करण्याची सोपी ट्रिक, जेवणानंतर एक चूक टाळा अन् स्लीम फिट रहा




**दि.७विदर्भ प्रजासत्ताक**

लठ्ठपणा किंवा पोटावर वाढलेली चरबी जगभरातील लोकांसाठी चिंतेचा विषय आहे. लोक लठ्ठपणा कमी करण्यासाठी नको नको ते करतात. पण अनेकांना लठ्ठपणा कमी करण्यात यश मिळत नाही. कारण हे वाटतं तेवढं सोपं काम नाही. पण अशक्यही नाही. तुम्ही सुद्धा लठ्ठपणा कमी करण्यासाठी काही वेगळा उपाय शोधत असाल तर हा लेख तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकतो.

वेट लॉस कोच एन–मारिया टॉम यानी इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ पोस्ट करून एक टिप दिली आहे. जी फॉलो करून तुम्ही अधिक वेगानं वजन कमी करू शकता. खासकरून पोटावर वाढलेली चरबी कमी करण्यास यानं अधिक फायदा होईल.

फिटनेस कोच सांगतात की, वजन वाढल्यावर लोक सगळ्यात आधी स्क्रिकक्ट डाएट फॉलो करणं सुरू करतात. पण जर तुम्ही डायटिंग करत नसाल आणि तुमच्याकडे वर्कआउटसाठी सुद्धा जास्त वेळ नसेल तर एक सोपी ट्रिक तुमच्या कामात पडू शकते.

एन–मारिया टॉम सांगतात की, जेवण केल्यावर केवळ १ हजार पावलं चालल्यास शरीराची फॅट बर्निंग प्रोसेस ॲक्टिव होते. अशात तुम्ही रोज जेवण केल्यावर १ हजार पावलं चालू शकता. ज्यासाठी तुम्हाला केवळ १० ते १५ मिनिटांचा वेळ लागेल. म्हणजे इतका कमी वेळ काढून तुम्ही वेट लॉस जर्नी सोपी करू शकता.

**कसा मिळतो फायदा?**

फिटनेस कोट सांगतात की, जेवण केल्यानंतर शरीरात शुगरचं प्रमाण वाढतं. जेव्हा तुम्ही जेवण झाल्यावर बसून राहता तेव्हा हे एक्स्ट्रा ग्लूकोज फॅटच्या रूपात पोटाच्या आसपास जमा होऊ लागतं. जेव्हा तुम्ही जेवण झाल्यावर लगेच पायी चालता तेव्हा ग्लूकोज थेट स्नायूंमध्ये जातं आणि शरीर त्याला फॅट बनण्याआधी एनर्जीच्या रूपात वापरतं. अशाप्रकारे जेवणानंतर केवळ १० मिनिटं पायी चालून तुम्हाला वजन कमी करण्यास मदत मिळू शकते.

कोच सांगतात की, खासकरून रात्री जेवण झाल्यावर १० ते १५ मिनिटं पायी चालण्यानं सुरूवात करा. या सवयीनं पचनक्रियाही सुधारते, तसेच ब्लड शुगरही कंट्रोल राहते. सगळ्यात मोठा फायदा म्हणजे यानं वजन कमी करण्यास मदत मिळते.

# आषाढीच्या दुसऱ्या दिवशी घेतात शिळ्या विठोबाचे दर्शन; कारण...




शीर्षक वाचून तुम्ही म्हणाल, ऐकावं ते नवलंच! पण तुमचं म्हणणं अगदी योग्य आहे. शिळा विठोबा अशी संकल्पना आपण याआधी क्वचितच ऐकली असेल. पण जेव्हा आपण ज्येष्ठ श्रेष्ठ मंडळींच्या सान्निध्यात बसतो, तेव्हा अशा अनेक नवनवीन गोष्टींचा उलगडा होतो. तर आषाढी एकादशीच्या दुसऱ्या दिवशी शिळ्या विठोबाचे दर्शन घेण्याआधी जाणून घेऊया या संकल्पनेबद्दल!

आषाढी एकादशीचा दिवस तसा धामधुमीचा! पूर्वी लोक आषाढीचा उत्सव झाला तरी दुसऱ्या दिवशी पुन्हा विठ्ठल मंदिराच्या दिशेने जाताना दिसत. एवढ्या सकाळी ते तिथे का जात असावेत असा एका आजींना प्रश्न विचारला असता त्या म्हणाल्या, 'ते सगळे शिळ्या विठोबाचे दर्शन घ्यायला निघाले आहेत.

वास्तविक विठोबा कधीच नवा, जुना किंवा शिळा होत नसतो. तो कधीही बघा, राजस सुकुमारच दिसतो. मग शिळा विठोबा ही संकल्पना आली कुठून ? तर भोळ्या भक्तांच्या भोळ्या भावातून! भाविक मनुष्य जे जे आपल्याला आवडतं ते देवाला अर्पण करतो. मग ती शिळी भाकरी का असेना. संत देखील याच भोळ्या भावनेने देवाला न्हाऊ, माखू घालत, देवाचा साज शृंगार करत, देवाला नेसायला वस्त्र, झोपायला गादी, लोड, पांघरूण, जेवायला नानाविध पदार्थ असं सारं काही देत असत; नव्हे अर्पण करत असत.

असाच हा शिळा विठोबा, त्यांच्या मनातला, संकल्पनेतला! जो आषाढीच्या दिवशी भक्तांची भेट घेऊन दमलेला असेल. दुसऱ्या दिवशी उशिरा उठला असेल आणि अशा वेळी त्या थकलेल्या विठोबाचा शीण घालवण्यासाठी त्याला पेलाभर पाणी, दूध, तुळशीची माळ अर्पण करून दर्शन घ्यावं, असा नियम भाविकांनी आखला असेल. म्हणून आषाढीच्या दिवशी विठोबाचे दर्शन तर घेतातच, पण दुसऱ्या दिवशी सकाळी दमलेल्या विठोबाचे अर्थात शिळ्या विठोबाचेही दर्शन घेतात.

या छोट्याशा कृतीतून मोठा धडा मिळतो, तो म्हणजे माणुसकीचा! आपली संस्कृती केवळ मूर्तिपूजा शिकवत नाही तर मूर्तिपूजेतून माणुसकीची पूजा शिकवते. जशी विठोबाची चौकशी कराल तशी आपल्या माता पित्याची, सगे सोयऱ्यांची, आजूबाजूच्या लोकांची आपुलकीचे चौकशी करा. त्यांना हवं नको ते द्या. मृत्यूनंतर आपल्या नावे दानधर्म करण्याआधी जिवंतपणी शक्य तेवढी मदत करा. एकमेका सहाय्य्य करू, अवघे धरू सुपंथ!

'भोळा भाव आणि देवा मला पाव' असा सच्चा भाव बघून देव का बरे प्रसन्न होणार नाही? आजच्या बेगडी जगात एवढी निरागसता बघायला मिळत नाही. जिथे तिथे फोटो काढून आपल्या भाव भावनांचे प्रगटीकरण करायचे आणि जगाला दाखवायचे असा ट्रेंड आला आहे. मात्र आपली आजी, पणजी कुणी बघावं म्हणून नाही, तर आपल्याला जाऊन देवाला बघता यावं यासाठी देवदर्शन घेत असत. परिणामी देवाचेही त्यांच्याकडे लक्ष असे. आपणही तेवढा निर्मळ भाव आणण्याचा प्रयत्न करूया आणि (आता जमलं नाही तर जमेल तेव्हा) शिळ्या विठोबाचे दर्शन घेऊया.

# मका पेरलाय, लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी ही फवारणी कराच, वाचा सविस्तर




विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**दि.७विदर्भ प्रजासत्ताक**

नाशिक जिल्ह्यात खरीप हंगामातील मका हे महत्वाचे तृणधान्य पिक आहे. सद्यस्थितीत मका पिकाची पेरणी १९ हजार ६ हजार हेक्टर क्षेत्रावर झालेली असून मका पिकाच्या सरासरी क्षेत्राच्या ८३ टक्के क्षेत्रावर पेरणी झालेली आहे.

पेरणी झालेल्या मका पिकावर काही ठिकाणी नवीन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. सदर किडीच्या नियंत्रणासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना कराव्यात.

**लक्षणे :**

नवीन लष्करी अळीचा प्रादुर्भाव मका पीक १५ दिवसापासून ते कणी अरेपर्यंत दिसून येते. प्रथम अवस्थेतील अळी ही कोवळ्या पानांवर आपली उपजीविका करते. एका बाजूने खरवंडून खाल्ल्यामुळे पानावर पांढरे ठिपके दिसून येतात. पूर्ण वाढ झालेल्या अळ्या झाडाची पूर्ण पाने खाऊन फक्त पानाच्या मिराना शिल्लक ठेवतात. पाने अर्ध्यातून खाऊन कापून टाकते. अळीच्या प्रादुर्भावाने पिकाच्या गाभामध्ये ओला, पिवळा, तपकारी रसाचे खाउन शिलक राहिलेल चुरा भरून ठेवते.

**प्रतिबंधात्मक उपाय :**

नवीन लष्करी अळी समूहाने अंडी घातल्याने अंडपुंज व समूहातील बारीक अळ्या हाताने वेचून नष्ट करावी, नवीन लष्करी अळीचे पतंगाच्या देखरेखीसाठी प्रती हेक्टरी ५ कामगंध सापळ्याचा वापर करावे. तसेच पतंगाच्या एकात्मिक प्रतीबंधासाठी २० सापळे स्थापित करावी. नवीन लष्करी अळीचे पतंग नियंत्रणासाठी प्रती हेक्टरी १ प्रकाश सापळ्याचा वापर रात्री ६ ते १० च्या दरम्यान चालू ठेवावे. किडीची अळी अवस्था नियंत्रणासाठी प्रती एकरी २० पक्षी धाबे उभे करा

**जैविक नियंत्रणाचे उपाय**

पेरणीच्या वेळेस निबोळी पेंड प्रती हेक्टरी २५० किलो किडीची कोश अवस्था नियंत्रणासाठी वापरावे. ट्रायकोग्रामा चीलोणीस या परजीवी किडीची अडी ३० हजार / प्रती एकर पीक १५ दिवसाचे झाल्यावर आठवड्यातून एकदा सोडावे. नवीन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी बेरीया बसिना १.१५ डब्लुपी प्रती ५० मिली/१५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. नवीन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी पिकाच्या सुरुवातीच्या काळात ५६ निंबोळी अर्काची फवारणी करावी. नवीन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी दर्शपर्णी अर्क प्रती १५० मिली/१५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**रासायनिक नियंत्रणाचे उपाय :**

जर नवीन लष्करी अळीची संख्या आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडली (१०% प्रादुर्भाव ग्रस्त झाडे/५ ते १० पतंग / प्रती सापळा/ सलग ३ रात्र) तर खालील किटकनाशकाची फवारणी करावी.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# मी मराठीतूनच शिकलो, मातृभाषेतून शिकल्याने विषयांची समज पक्की होते; सरन्यायाधीश भूषण गवई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

मी स्वतः मराठी माध्यमातून शिकलेला विद्यार्थी आहे. मातृभाषेतून शिक्षण घेतल्यामुळे विषयांची समज अधिक पक्की होते. शिक्षणासोबतच संस्कारही रुजतात, हेच संस्कार आयुष्यभर साथ देतात, असा आत्मविश्वास देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी विद्यार्थ्यांना दिला. त्यांनी रविवारी गिरगाव येथील चिकित्सक समूह शिरोळकर विद्यालयाला भेट देत आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. प्राथमिक ते माध्यमिक शिक्षण घेतलेल्या या विद्यालयात पुन्हा पाऊल ठेवताना सरन्यायाधीश गवई यांनी आपली जडणघडण करणाऱ्या शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.



याप्रसंगी राज्याचे कौशल्य विकासमंत्री व मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जमादार, चिकित्सक समूहाचे अध्यक्ष किशोर रांगणेकर, सचिव डॉ. गुरुनाथ पंडित, मुख्याध्यापिका संचिता गावडे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

सरन्यायाधीश गवई यांनी शाळेतील वर्गखोल्या, वाचनालय, चित्रकला विभाग आदींची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच शालेय जीवनात त्यांच्यासोबत शिकलेल्या मित्रांशी गप्पा करत जुन्या आठवणींना उजाळा दिला.शाळेतील विद्यार्थ्यांनी दिलेली मानवंदना हा त्यांच्या दृष्टीने अत्यंत भावनिक आणि अभिमानाचा क्षण ठरला. सरन्यायाधीश भूषण गवई यांची उपस्थिती शाळेसाठी अत्यंत गौरवाची व प्रेरणादायी ठरली.

आज मी ज्या उंचीवर पोहोचलो आहे, त्यामागे माझ्या शिक्षकांचे आणि शाळेचे फार मोठे योगदान आहे.याच शाळेतील संस्कारामुळे माझ्या आयुष्याला योग्य दिशा मिळाली.

वक्तृत्वाची सुरुवातीची पावले याच व्यासपीठावर पडल्याची आठवण सांगितली. वक्तृत्व स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रमांमधून आत्मविश्वास मिळाला. त्या संधींमुळेच मी घडलो.मातृभाषेतून शिक्षणासोबतच संस्कारही रुजतात, हेच संस्कार आपल्याला आयुष्यभर साथ देतात.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

सोमवार दि. ७ जुलै २०२५

शहर/ग्रामिण


# आ. संजय खोडकेंच्या लक्षवेधीनंतर एमडी तस्करांवर पोलिसांची कारवाई

## ४.८८ लाखांची एमडी जप्त, नागपुरी गेट पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

आमदार संजय खोडके यांनी सुरु असलेल्याअधिवेशनात शहरात होत असलेल्या ड्रग्ज तस्करीचा मुद्दा उचलून धरला होता. त्यामुळे शहर पोलीस अधिक सतर्क झाली आहे. रविवारी (दि. ६) सायंकाळी नागपुरी गेट पोलिसांनी एका युवकाला ताब्यात घेत त्याच्याकडून ७५. ९६० ग्रॅम एमडी ड्रग्ज व दुचाकी असा एकूण ४ लाख ८८ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला व युवकाला अटक केली. इम्रान खान उर्फ ईम्मा सलीम खान (वय २६ रा.पाटीपुरा) असे अटकेतील युवकाचे नाव आहे.




अमरावती शहरात ड्रग्ज व अंमली पदार्थांची मोठ्या प्रमाणात तस्करी होत असून मोठे रॅकेट शहरात सक्रियआहे. तसेच तस्करीचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याने पोलीस विभागाकडून ड्रग्ज तस्करांना पोलीस विभागाकडूनवरदहस्त मिळते का? असा संशय व्यक्त करीत गृहविभागाने यावर कठोर कारवाई करण्याची लक्षवेधी सूचना आ. संजय खोडके यांनी केली होती. तेव्हा महाराष्ट्राचेमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या गंभीर विषयावर थेट पोलीस आयुक्तांशी बोलणार असे सांगितले होते. यात खोडके यांनी शहरातील विशिष्ठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतया तस्करीचे प्रमाण अधिक असल्याचेही म्हटले होते. आ. संजय खोडके यांच्यापावसाळी अधिवेशनातील लक्षवेधीनंतरअमरावती शहर पोलीस अधिक सतर्क झाल्याचे दिसून येत आहे. नागपुरी गेट पोलिसांनी एमडी ड्रग्जची खेप घेऊन जाणाऱ्या युवकाला रविवारी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास पाटीपुरा येथून अटक केली. तसेच त्याच्या ताब्यातून ७५.९६० ग्रॅम ड्रग्ज व दुचाकी असा एकूण ४ लाख ८८ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याकारवाईत ठाणेदार हनमंत उरलागोंडावर, पोलीस उपनिरीक्षक गजानन विधाते, पोलीस अंमलदार अहमद अली, संतोष यादव, दानिश शेख, सागर पंडित आणि राहुल रोडे यांचा समावेश होता. इम्रान खान उर्फ ईम्मा हा एमडी ड्रग्ज विकत असल्याची माहिती नागपुरी गेट पोलिसांना होती. त्यामुळे पोलीस दोन दिवसांपासून त्याच्यावर लक्ष ठेऊन होते. तो कुठे जातो, कोणाला भेटतो, मोबाईलवर कुणासोबत अधिक वेळ संवाद साधतो अशा त्याच्यासर्व हालचालींवर पोलिसांचे लक्ष होते. परंतु दोन दिवस तो पोलिसांच्या जाळ्यात अडकला नाही. मात्र रविवारी सायंकाळी तो एमडी घेऊन बाहेर जात असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी त्याच्या घरासमोरच त्याला अटक करून ड्रग्ज जप्त केली. परंतु ड्रग्जची तस्करी करणाऱ्या मुख्य तस्करापर्यंत अद्यापही पोलीस पोहोचले नाहीत. त्यामुळे शहरात खुलेआम ड्रग्ज व अंमली पदार्थांची विक्री होत असल्याचे नाकारता येत नाही. आमदार संजय खोडके यांनी अधिवेशनात विषय मांडताना म्हटले होते की, शहरामध्ये एका वर्षात ड्रग्ज व मादक पदार्थ तस्करीचे ३१ प्रकरणे समोर आली आहेत आणि जास्तीत जास्त प्रकरण एकाच पोलीस ठाण्याअंतर्गत घडत आहेत. त्यामुळे ड्रग्ज व अंमली पदार्थ विकणाऱ्यांवर कारवाई होऊन देखील तोच पुन्हा धंदा करीत आहे. त्यामुळे ड्रग्ज तस्करांची एक साखळी निर्माण झाली आहे. तसेच ड्रग्ज व अंमली पदार्थ ग्राहकांपर्यंत पोहचविण्याकरिता अल्पवयीन मुलांचा वापर केला जात आहे. अमरावती शहर लहान आहे, त्यामुळे कुठे काय सुरू आहे व कोण सहभागी आहे, याबाबत खुफिया व ठाण्याच्या बिट जमादारांसह डीबी कर्मचाऱ्यांना चांगल्या पध्दतीने माहिती असताना याकडे डोळेझाक केली जात असल्याची शंकासुध्दा आमदार संजय खोडके यांनी उपस्थित केली होती. परंतु अद्यापही मुख्य एमडी ड्रग्ज तस्करांपर्यंत पोलीस पोहोचले नाही.

**नोंदणी नसलेल्या वाहनांचा केला जातो वापर**

शो रुममधून वाहन बाहेर आले परंतु त्या वाहनाची आरटीओ कार्यालयात नोंदणी नाही अशाच वाहनाचा ड्रग्ज तस्कर वापर करीत आहेत. तसेच त्यांच्या वाहनाची नंबर प्लेट काळी किंवा विना नंबरचे वाहन तस्कर वापरत आहेत. रात्रीला शहरातील काही क्लब व पबसमोर ही वाहने उभी असतात. परंतु अद्यापही पाहिजे त्याप्रमाणे कारवाई नाही. त्यामुळे शहरासह ग्रामीण भागातसुध्दा एमडी ड्रग्ज पोहोचले आहे. पोलिसांनी वेळीच ड्रग्ज तस्करांच्या मुसक्या आवळल्या नाही तर आ. संजय खोडके यांनी उपस्थित केलेल्या शंकेनुसार जिल्हा नशेच्या गर्तेत गेल्याशिवाय राहणार नाही.

**नागपूर, मुंबई आणि इंदोरहून एमडीचा सप्लाय**

नागपूर, मुंबई आणि इंदोर येथून मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्ज शहरात येते. तसेच मुख्य ड्रग्ज तस्कर गरजू मुलांच्या माध्यमातून रेल्वे, कार किंवा ट्रॅव्हल्सच्या माध्यमातून एमडी ड्रग्ज बोलावितात. त्यांना एक खेप आणायची मोठी रक्कम व ये-जा करण्याचे भाडे व भत्ता दिला जातो. त्यामुळे या रॅकेटमध्ये बरीच मुले गुंतली असण्याला अधिक वाव मिळतो.

# लोकनेते भैय्यासाहेब ठाकूर यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती



**विदर्भ प्रजासत्ताक दि.७तिवसा**

लोकनेते, माजी आमदार भैय्यासाहेब ठाकूर यांच्या पुण्यतिथीनिमित्त रविवार ६ जुलै रोजी मोझरी येथील सिंधीबांडी परिसरात भावपूर्ण श्रद्धांजली कार्यक्रम पार पडला.

या अभिवादन कार्यक्रमात खासदार बळवंतराव वानखडे, श्रीमती पुष्पमाला भैय्यासाहेब ठाकूर, माजी मंत्री ॲड. यशोमतीताई ठाकूर, डॉ. राजीव ठाकूर, आकांक्षा ठाकूर यांच्यासह शेकडोच्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी आणि ग्रामस्थाच्यावतीने लोकनेते भैय्यासाहेब ठाकूर यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यावेळी स्व. भैय्यासाहेब ठाकूर यांच्या सामाजिक, राजकीय व लोकहिताच्या कार्याची आठवणकरून देण्यात आली. त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन निष्ठावान कार्यकर्ते त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत आहेत, असे उद्गार यावेळी मान्यवरांनी काढले. यावेळीसुरेशराव साबळे, रघुनाथराव वाडेकर, हरीभाऊ मोहोड, हरीश मोरे, श्रीकांत बोंडे, आशुतोष देशमुख, पंकज यावलीकर, प्रविण देशमुख, मुकुंदराव देशमुख, यांच्या सह कॉंग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्वारीची खरेदी पुन्हा सुरू करावी सेंद्रिय शेतीसाठी सबसिडी द्यावी

## आ. प्रतापदादा अडसड यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७धामणगाव रेल्वे**

ज्वारीची खरेदी नाफेडच्या माध्यमातून सुरू असताना पोर्टल बंद पडले. ते पुन्हा सुरू करावी तसेच सेंद्रिय शेतीसाठी अभ्यासगट स्थापन करून सबसिडी देण्यात यावी, अशी मागणी विधानसभेत आमदार प्रतापदादा अडसड यांनी केली.विरोधकांच्या २९३ अन्वये प्रस्तावा अंतर्गत कृषी विभाग व शेतकऱ्यांच्या संबंधित बोलताना आ अडसड यांनी शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न विधानसभेत मांडले. मागील अनेक वर्ष देशात, राज्यात कॉंग्रेसची सत्ता होती त्यांनी शेतकऱ्यांसाठी काही केले नाही आता मगरीचे अश्रू दाखवत आहे महायुतीचे सरकार आल्यानंतर शेतकऱ्यांसाठी मोफतविजेचे दिलेले वचन पूर्ण करीत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या नेतृत्वात हे महायुतीचे सरकार शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेत आहे सोलर फिडरच्या माध्यमातून दिवसा शेतकऱ्यांना वीज उपलब्ध करून देत आहे. माझ्या मतदारसंघात अडीच हजार शेतकऱ्यांना दोन फिडरवरून दिवसा मोफत विजेचा लाभ मिळत असल्याचे ते म्हणाले.



शक्तिपीठ प्रमाणे सोफिया प्रकल्प, समृद्धी प्रकल्प यांना कॉंग्रेस नेत्यांनी विरोध केला होता त्यानंतर समृद्धी प्रकल्पासाठी सर्वात प्रथम याच नेत्यांनी स्वतःची शेत जमीन देऊन आपला फायदा करून घेतला. चांगल्या प्रकल्पाला विरोध दाखवणे ही कॉंग्रेसची संस्कृती झाली असल्याचे त्यांनी आपले स्पष्ट मत विधानसभेत मांडले

शेतकऱ्यांना पंपउपलब्ध करून द्याज्या शेतकऱ्यानी अनेक वर्षाची पंप साठी डिमांड भरली त्या शेतकऱ्यांना सोलर उपलब्ध करून द्यावें, शेतकऱ्यांच्या पांदन रस्त्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून दिला असल्याने काही दिवसात हे रस्ते पूर्णत्वास येईल असे आ प्रतापदादा अडसड म्हणाले.

# बच्चू कडू यांच्या अपात्रतेवर १४ जुलैला महत्त्वाची सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि माजी मंत्री बच्चू कडू यांच्या अपात्रता प्रकरणाची सुनावणी १४ जुलै रोजी होणार आहे. विभागीय सहनिबंधक प्रवीण फडणीस यांनी कडू यांना अध्यक्ष आणि संचालक पदासाठी अपात्र ठरवले होते. मात्र मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने या अपात्रतेला स्थगनादेश दिला आहे.



सहकार विभागाने १६ जून रोजी कडू यांना अपात्र घोषित केले होते. नाशकात केलेल्या आंदोलनासाठी एक वर्षाची शिक्षा झाल्याचा ठपका ठेवण्यात आला होता. त्यांना पुढील पाच वर्षे निवडणुकीत सहभागी होण्यास मनाई करण्यात आली होती. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क अन्वये ही कारवाई करण्यात आली.

सहकार विभागाने कडू यांच्या उर्वरित कालखंडासाठी पोटनिवडणूक घेण्याची तयारी सुरू केली होती. या निवडणुकीत त्यांना उमेदवार म्हणून सहभागी होता येणार नव्हते. मात्र स्थगनादेशामुळे ही प्रक्रिया थांबली आहे. १४ जुलैच्या सुनावणीनंतर स्थगनादेश कायम राहतो की संपुष्टात येतो, याचा निर्णय होईल.

# पुरुष गटात नागपूर तर महिला गटात बुलढाणा अजिंक्य

## ७१ वी आमदार चषक विदर्भ राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा : अमरावती महामगर कबड्डी (सं) असोसिएशन, अमरावती




**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**


पुरुष गटात नागपूरच्या संघाने भंडारा संघावर एकेरी मात करीत तर महिला गटात बुलढाणा संघाने वाशिम संघाचा सुध्दा एकेरी पराभव करीत ७१ व्या आमदार चषक विदर्भ राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेचे अजिंक्यपद प्राप्त केले.

गेल्या दोन दिवसांपासून अमरावतीच्या विभागीय क्रीडा संकुलावर अमरावती जिल्हा कबड्डी (संघ) असोसिएशनच्या यजमान पदाखाली सुरु असलेल्या ७१ व्या विदर्भ राज्य अजिंक्यपद वरिष्ठ पुरुष व महिला कबड्डी स्पर्धा आमदार चषक स्पर्धेचा आज समारोप करण्यातआला. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे,भाजपा जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, प्रसिध्द उद्योजक रविराज देशमुख, पवन जाजोदिया, माजी महापौर विलास इंगोले, ॲड. विवेक बारलिंगे, विदर्भ कबड्डी असोसिएशनचे सचिव प्रदिपसिंह ठाकूर, सहसचिव अजय शिंगाडे, रेफ्रीबोर्डाचे अध्यक्ष सतिष इखार, अमरावती जिल्हा कबड्डी संघटनेचे अध्यक्ष विवेक गुल्हाने, सचिव नितीन सराफ, पंकज लुंगीकर यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी मंचावर उपस्थित होते.यावेळी खा. डॉ. अनिल बोंडे यांनी कबड्डी हा आपल्या मातीतला खेळ असून खेळांडूनी संघ भावनेतून चांगल्या खेळाचे प्रदर्शन करावे, खेळामध्ये सरकार मोठ्या संधी उपलब्ध करून देत आहे. त्याचा सुध्दा खेळाडूंनी लाभघ्यावा असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाचे संचालन संदिप इंगोले यांनी व आभार सचिव नितीन सराफ यांनी मानले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी अतुल इंगोले, योगेश भोसले, राजेश गाडे, मिलींद पाटील, मिलींद बांबल, धनराज यादव, शरद गढीकर, गणेश वरुडकर, अतुल देशमुख, संतीष ठाकूर, निलेश सराफ, राजेंद्र तुळे, सचिन मेहरे यांच्यासह कार्यकत्यांनी सहकार्य केले.

# सेंट्रल बँक भाडेतत्वावरील न.प. इमारत सोडण्याच्या तयारीत : नगर परिषदेच्या उत्पन्नाला बसणार कात्री

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७चांदूर रेल्वे**

मागील अनेक वर्षांपासून नगर परिषदेच्या इमारतीत असलेल्या चांदूर रेल्वे शहरातील आठवडी बाजार स्थित सेंट्रल बँक ऑफ इंडिया च्या बँकेला काही महिन्याअगोदर शॉर्ट सर्किटमुळे आग लागली होती. त्यात बँकेचे मोठे नुकसान झाले होते, परंतू आता त्याला महिने लोटले असतांनाही नगर परिषद आपल्या इमारतीची दुरस्ती करून देण्यास टाळाटाळ करीत असल्याने सेंट्रल बँक न.प. ची इमारत सोडण्याच्या तयारीत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे न. प. च्या आयत्या उत्पनाला कात्री बसणार आहे.



सदर बँक ही नगर परिषदेला महिन्याकाठी टॅक्स व भाडे धरून २६ हजार तर वर्षाला जवळपास तीन लाख इतके भाडे देत होती. १५ मार्च २०२५ रोजी सकाळच्या सुमारास बँकेला अचानक लागलेल्या आगीत बँकेच्या साहित्यांसह इमारतीच्या दार, खिडक्या व टाईल्स चे नुकसान झाले. ते दुरूस्त झाल्याशिवाय बँकेला फर्निचर करता येत नाही. परंतु वारंवार पाठपुरवठा करूनही न. प. प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे समजते. त्यामुळे नाईलाजाने बँक प्रशासनाला आता दुसऱ्या खाजगी इमारतीत बँकेला न्यावे लागत आहे. यामुळे न. प. प्रशासनाचे म्हणजेच सर्वसामान्य नागरिकांचे नुकसान होणार आहे. यावर बँक मॅनेजर यांना बँकेचे व्यवहार लवकरात लवकर सुरळीत करून ग्राहकांना होणारा त्रास दूर करायचा आहे, परंतु नगर परिषद काहीच प्रतिसाद देत नसल्याने नाईलाजाने बँक खाजगी जागेत न्यावी लागत असल्याचे बँक मॅनेजर मंगेश भुरे यांनी सांगितले.दुरूस्तीसाठी न. प. कडे निधी नाही बैंक न. प. इमारतीतच राहावी अशी आमची इच्छा आहे. पण प्रशासनाचे काम आहे, टेंडर जाहिरात ह्या सर्व प्रोसेस करणे आणि त्यानंतर ही निधी उपलब्ध करून देणे आणि सध्या न.प. कडे निधी नाही. या सर्व प्रक्रिया आल्यात त्याला वेळ लागतो. या सर्व आमच्या अडचणी असल्याचे मुख्याधिकारी विकास खंडारे यांनी सांगितले.

**लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची गरज**

एकीकडे अनेक नगर परिषद विविध सुविधा उपलब्ध करून न.प. चे उत्पन्न वाढीचे सोर्स शोधत असतात. परंतू चांदूर रेल्वे नगर परिषद मात्र चालू उत्पन्न बंद करीत आहे. याकडे लोकप्रतिनिधी यांनी लक्ष देण्याची गरज वाटत असल्याच्या प्रतिक्रिया अनेक बँक ग्राहकांनी दिल्यात.

# विठू-माउलीचा गजर अन् पालखी व पदयात्रेने दुमदुमली गुरुकुंजनगरी

## रामकृष्णहरी मंदिर दासटेकडीवर आषाढी एकादशी महोत्सव : प्रति पंढरपूरात भक्तांची मांदियाळी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७तिवसा**

विठ्ठल.. विठ्ठल.. विठ्ठला.. पांडुरंग विठ्ठला च्या जयघोषात परिसरातील श्री क्षेत्र गुरुकुंजातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या महासमाधी पासून ते रामकृष्णहरी विश्वमानव मंदिर दासटेकडी पर्यंत टाळ मृदुंगाच्या गजरात, भगवी पताका उंच थिरावत आषाढी एकादशीनिमित्त भव्य पालखी व पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रा व पालखी दरम्यान विठ्ठल रखुमाई यांची वेशभूषा परिधान केलेली बहुरुपी आकर्षनाचा केंद्र बिंदू ठरले. विठू नामाच्या गजराने अक्षरशः गुरुकुंजनगरी दुमदुमून गेली होती.




गुरुकुंजातील राम कृष्ण हरी विश्वमानव मंदिर दासटेकडी म्हणजे विदर्भातील दुसरं मिनी पंढरपूर असे म्हटल्या जाते. याठिकाणी आषाढी एकादशी निमित्त भाविकांची दर्शन घेण्यासाठी मांदियाळी होते. विदर्भातील जे वारकरी भक्त पंढरपूरला जाऊ शकत नाही ते प्रति पंढरपूरम्हणून ओळखल्या जाणाऱ्या दासटेकडी येथील रामकृष्णहरी मंदिर येथे येऊन समाधान व्यक्त करतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या संकल्पनेतून हे मंदिर साकारण्यात आले आहे. या ठिकाणी शेकडो भाविक पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी येतात. जे भाविक पंढरपूर येथे विठ्ठलाच्या दर्शनासाठी काही कारणास्तव जाऊ शकत नाही ते आषाढी एकादशीच्या दिवशी गुरुकुजातील दासटेकडी येथे दर्शनासाठी येतात व येथील दोन दिवसीय कार्यक्रमाचा लाभ घेतात. आज सकाळपासूनच याठिकाणी भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी झाली असून आज पहाटे चार वाजता रामकृष्णहरी भगवंताची पूजा व अभिषेक करून या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी गुरुकुंजातुन निघालेल्या मानाच्या पालखी व पदयात्रेचे प्रवेशद्वारावर अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामंडळ तर्फे पूजन व भव्य स्वागत करण्यात आले. दुपारी १२ वाजताच्या दरम्यान अभंग रंगले पांडुरंगी, हा अभंगवाणीचा कार्यक्रम सादर करण्यात आला असून याकरिताअखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामण्डळ मानव सेवा छश्रत्रालयातील विद्यार्थी, व भाविक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. एक सूर, एक ताल याप्रमाणे येथील विठू नामाचा गजर पाहण्यासारखा होता. सायंकाळी सामुदायिक प्राथनेने आयोजित कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# सिंभोरा रोड वरील मोटरसायकल व स्कूटीच्या अपघातात युवक ठार

## महिलेसह दोन तरुणी गंभीर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७मोर्शी**

मोर्शी ते सिंभोरा रोडवरील असलेल्या नशीदपूर गावाच्या फाट्याजवळ मोटरसायकल व स्कुटीच्या आमने-सामने झालेल्या धडकेत एका (२३) वर्षीय युवकाचा घटनास्थळी मृत्यू झाला असून सदरच्या अपघातात एका गर्भवती महिलेसह दोन युवतींना गंभीर अवस्थेत अमरावती येथे खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. सदर घटना रविवार दि.६ जून रोजी सायंकाळी ६ वाजताच्या दरम्यान घडली होती.

अपघातात मृत झालेल्या युवकाचे नाव नकुल राजेश नवले वय २३ वर्ष रा. अंतोरा तालुका आष्टी जिल्हा वर्धा असे आहे.याबाबत मिळालेल्या माहितीनुसार करिष्मा भीमराव रामटेके वय ३२ वर्ष रा. वरुड, महिमा प्रदीप भोकरे वय २५ वर्ष रा. अमरावती व दिपाली हरिदास पाटील वय २३ वर्ष रा. ब्राह्मणवाडा (भगत) यातील एक महिला सह दोन तरुणी मोर्शी येथीलबँक कार्यरत असून या तिघी मैत्रिणीआषाढी एकादशी व रविवार सुट्टीचा दिवस असल्यामुळे त्या आपली स्कुटी क्र. एम. एच. २७ डी यु ६५०९ ने नळ दमयंती जलाशय पाहण्यासाठी गेल्या होत्या. धरण पाहून येत असतांना नकुल राजेश नवले वय २३ वर्ष रा.अंतोरा हा आपली दुचाकी मोटर सायकल क्र.एम एच २७ एपी २७६५ ने अंतोरा येथे जात



असतांना या दोन्ही दुचाकी वाहनांची समोरा समोर जबर धडक बसली. या अपघातात नकुल नवले याचा घटनास्थळी मृत्यू झाला. घटनेची माहिती पोलिसांना मिळताच जखमींना रुग्णवाहिकेतून उपजिल्हा रुग्णालय आणण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सर्व जखमींवर औषधोपचार केल्यानंतर एका महिलेसह दोन तरुणीला अतिशय गंभीर मार बसल्यामुळे त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती येथे रवाना करण्यात आले. पुढील तपास पोलीस करीत आहे.

# अप्पर वर्धा धरणात सध्या ४२.६८ टक्केच जलसाठा धरण परिसरात दमदार पावसाची प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७मोर्शी**

अप्पर वर्धा धरणाला वरदान ठरणाऱ्या मोर्शीपासून अवघ्या आठ कि.मी. अंतरावर असलेल्या अप्पर वर्धा धरणाच्या जलाशयाची पातळी ६ जुलै रोजी ३३८.१३ मीटर एवढी असून, ३० एप्रिल व त्यानंतरच्या मे महिन्यात ३३८८० मीटर एवढी जलाशयाची पातळी होती. त्यावेळी धरण ४७.६४ टक्के भरले होते. आता ६ जुलै रोजी धरण केवळ ४२.६८ टक्के भरले आहे.

अप्पर वर्धा धरणाची निर्धारित जलाशयाची पातळी ३४२.५० एवढी ठेवण्यात आली आहे.




यावर्षीचा पावसाळा सुरू झाल्यानंतर दोन दिवसांच्या पावसामुळे मध्य प्रदेशातून वाहत येणाऱ्या माहू नदीला थोडेफार पाणी येऊन जलाशयाची पातळी दोन सेंटिमीटरने वाढली होती.मात्र, आता मोर्शी तालुक्यात पाऊस अगदी कमी प्रमाणात कोसळत असल्यामुळे पुन्हा जुलै महिन्यात जलाशयाची पातळी घटली आहे. अप्पर वर्धा धरणाच्या जलाशयातून मोर्शी व वरूड, महानगरपालिका अमरावती, रतन इंडिया, एमआयडीसी यांसह हिवरखेड, लोणी, राजुरा, आदी गावांत पाणीपुरवठा होत आहे.

**दमदार पावसाची प्रतीक्षा**

यावर्षी मोसमी पावसाच्या प्रारंभाचा जून महिना तुरळक पावसाचा ठरला. अगदी ५ जुलैपर्यंत मोर्शी शहरासह तालुक्यात अगदी कमी प्रमाणात पाऊस कोसळत असल्यामुळे अलाशयाच्या पातळीत वाढ झाली नाही, उलट पाण्याची पातळी घटत चालली आहे.

**गतवर्षी ५ ऑगस्टला उघडली होती दारे**

अप्पर वर्धा धरणाच्या जलाशयातील पाण्याच्या पातळीत १५ जुलैनंतर होणाऱ्या पावसाने झपाट्याने वाढ होत असल्याचा अनुभव आहे. गतवर्षी ५ ऑगस्टला अप्पर वर्धा धरणाच्या १३ पैकी दोन गेट उघडण्यात आले होते. त्यानंतर १२ ऑगस्ट रोजी १३ पैकी ११ गेट ४० सेंटिमीटरने उघडण्यात आली होती. ६९३ घनमीटर प्रतिसेकंद पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला होता १४ ऑगस्ट रोजी अप्पर वर्धा धरणाला तिख्याची रोषणाई करण्यात आली होती.

# शाळेत पोहोचण्याआधीच विद्यार्थ्याचे अपहरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी शाळेत जाण्याकरिता निघालेल्या विद्यार्थ्यांचे शाळेत पोहोचण्यापूर्वीच अपहरण केल्याची घटना अंजनगाव सुर्जी पोलिसस्टेशन हद्दीत घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ५ जुलै रोजी दुपारी १२.३० ते ४.३० वाजताच्या सुमारास एका मुलाला त्याच्या आईने शाळेत जाण्यासाठी शाळेच्या गेटपर्यंत नेऊन सोडलेः परंतु तो खूप वेळ होऊनही शाळेतून परत आला नाही.

हा प्रकार त्याच्या आई-वडिलांच्या लक्षात येताच त्यांनी त्याचा ट्युशन क्लासेसमध्येसुध्दा शोध घेतला, परंतु तेथेही तो मिळून आला नाही. तेव्हा माहिती मिळाली की, मुलगा हा शाळेतच गेला नव्हता. शाळेत जाण्याआधीच त्याला कुणीतरी आमिष देऊन पळवून नेले असावे, या संशयावरून अंजनगाव सुर्जी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. त्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरूध्द मुलाच्या अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पुढील तपास अंजनगाव पोलिस करीत आहे.

# शेतकऱ्यांचा छळ, प्रकल्पग्रस्तांची फरफट,परप्रांतीय कामगारांचा भरणा : रतन इंडिया कंपनीचे अन्यायकारक धोरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७नांदगाव पेठ**

शेतकऱ्यांच्या जमिनीवर उभा राहिलेला रतन इंडिया ऊर्जा प्रकल्प आजही शेतकरी आणि स्थानिक प्रकल्पग्रस्त युवकांची क्रूर थट्टा करत असल्याचे वास्तव समोर आले आहे. प्रकल्पाच्या आजूबाजूच्या परिसरात उडणाऱ्या राखेमुळे शेतजमिनींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक शेतकऱ्यांची पिके अक्षरशः उद्ध्वस्त झाली आहेत. मात्र, कंपनीकडून कोणतीही नुकसानभरपाई देण्यात आलेली नाही.शेतकऱ्यांना कायदेशीर हक्क असलेला मोबदला मिळणे अपेक्षित असतानाही रतन इंडियातील अधिकारी वर्ग त्यांच्याशी उपहासात्मक आणि



अपमानास्पद वर्तन करत असल्याचे समोर आले आहे. या प्रकल्पासाठी अडीचशेपेक्षा अधिक स्थानिक प्रकल्पग्रस्त असतांना आजतागायत केवळ १६० प्रकल्पग्रस्तांना अल्पवेतनावर नोकरी देण्यात आली आहे. उर्वरित शेकडो प्रकल्पग्रस्तांना थेट धक्के मारून बाहेर काढण्यात आले असून आज ते बेरोजगारी व उपासमार सहन करत आहेत.स्थानिकांना केवळ दहा ते बारा हजार रुपयांवर कामावर ठेवले जात असताना, बाहेरून आणलेल्या परप्रांतीय कामगारांना ३० ते ४० हजार रुपयांपर्यंत वेतन दिले जात आहे. स्थानिक कुशल कामगार असूनही त्यांना दुर्लक्षित करण्यात येत आहे, ही बाब अधिकच संतापजनक आहे. या सगळ्या प्रकारामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये तीव्र नाराजी असून, स्थानिकांचा हक्क डावलून परप्रांतीयांना प्राधान्य देणाऱ्या व्यवस्थापनाविरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.या सगळ्या प्रकाराकडे जिल्हा प्रशासन, महसूल विभाग आणि पर्यावरण विभागानेही डोळेझाक केल्याचे चित्र आहे. पिकांचे नुकसान, राखेचे प्रदूषण, रोजगारातील भेदभाव या सर्व गंभीर मुद्यांवर कोणतीही चौकशी किंवा उपाययोजना करण्यात आलेली नाही त्यामुळे जिल्हा प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.

**राखेमुळे शेतीचा ऱ्हास पिकांचे नुकसान**

प्रकल्पाच्या आसपास असलेल्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर उडणाऱ्या राखेमुळे शेतजमिनीचे आणि पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. कपाशी, सोयाबीन, हरभरा यासारख्या पिकांवर राखेचा थेट परिणाम होत असून जमिनीच्या सुपीकतेत घट झाली आहे. यामुळे अनेक शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. तरीदेखील कंपनीकडून कोणतीही नुकसानभरपाई किंवा मदत शेतकऱ्यांना मिळालेली नाही. उलट त्यांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप स्थानिक शेतकरी करीत आहेत.

न्यायासाठी आंदोलनाची तयारीरोजच्या अन्यायाने त्रस्त झालेल्या शेतकरी व प्रकल्पग्रस्तांनी आता एकत्र येऊन आवाज उठवण्याचा निर्धार केला आहे. आम्ही जमीन दिली, भविष्य दिलं, पण आज आमच्याकडे उपजीविकेचे कोणतेही साधन उरलेले नाही अशी खदखद त्यांच्या बोलण्यातून दिसून येते. अनेकांनी आगामी काळात रतन इंडिया कंपनीविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.

# शासकीय गोदामातून सोयाबीन चोरणारी चौकडी जाळ्यात



**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

धामणगाव रेल्वे येथील शासकीय गोदामातून सोयाबीन चोरी करणाऱ्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी शनिवारी अटक केली आहे. अटक केलेल्या चोरट्यांकडून पोलिसांनी ९० हजार ८९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी अटक केलेल्या चोरट्यांच्या चौकडी व्यतिरिक्त एक जण अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे.मयूर प्रमोद कांबळे (२६), जितेंद्र जगदेव वानखडे (२७), सचिन सदाशिव राऊत (३६, तिघेही रा. धामणगाव रेल्वे) आणि नीलेश अशोक शेंडे (३५, रा. आसेगाव, घामणगाव रेल्वे) यांना पोलिसांनी अटक केली आहेत. धामणगाव रेल्वे येथील शासकीय विश्रामभवन परिसरातील शासकीय गोदाम फोडून ८७ हजार ६० रुपयांचे सोयाबीन चोरून नेण्यात आले होते. - या प्रकरणी तालुका कृषी अधिकारी गजाननरामदास राऊत यांनी ३ जून रोजी दत्तापूर ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. स्थानिक गुन्हे शाखेचे पथकही या गुन्ह्याचा समांतर तपास करत होते. तपासात हा गुहा मयूर कांबळे व त्याच्या साथीदारांनी केल्याचे समोर आले. त्यानुसार मयूर कांबळेला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने साथीदार जितेंद्र वानखडे, नीलेश शेंडे, सचिन राऊत व अमन व्यास यांच्या मदतीने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानुसार जितेंद्र वानखडे, नीलेश शेंडे व सचिन राऊत यांनाही ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून १ क्विंटल २१ किलो सोयाबीन व गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा ९० हजार ८१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक मुलचंद भांबुरकर व त्यांच्या पथकाने केली आहे.

# बोगस दिव्यांगांची फेर पडताळणी करा !जि.प. सीईओंच्या दालनात १६ जुलैला आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

चांदूर रेल्वे पं. स. मध्ये कार्यरत असलेले बोगस दिव्यांग कर्मचारी यांच्या अपंगत्वाची फेर पडताळणी करण्यात यावी, या मागणीसाठी जि.प. सीईओंच्या दालनात बुधवार, १६ जुलै रोजी दिव्यांग बांधव ठिय्या आंदोलन करणार आहेत, असा इशारा निवेदनातून अपंग जनता दलाने दिला आहे.

अपंग जनता दल सामाजिक संघटनेच्यावतीने राज्यामध्ये मागील एक वर्षापासून बोगस अपंग पकडा मोहीम सुरू करण्यात आली.या मोहिमेदरम्यान अनेक नागरिकांनी डॉक्टर व दलालांसोबत आर्थिक संगनमत करून अपंगांचे प्रमाणपत्र बनवून नोकऱ्या मिळवल्याचे दिसून आले आहे. अशा लोकांची व्यक्तिशः पाहणी व चौकशी केली असता ते बोगस अपंग असल्याचेआढळून आले. यामध्ये चांदूररेल्वे पंचायतसमितीमध्ये कार्यरत असलेले काही कर्मचारी यांची पं. स. स्तरावर तक्रार करूनही त्यांच्या अपंगत्वाची फेर पडताळणीबाबत कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे जि. प. स्तरावर आरोग्य उपसंचालक, अकोला येथे त्यांच्या अपंगत्वाची फेरपडताळणी करण्याचे सक्तीचे आदेशित करावे, अन्यथा १६ जुलै रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून दिला आहे. यावेळी राहुल वानखडे, राजिक शाह, ज्योती देवकर, कांचन कुकडे आदी उपस्थित होते.

# रिध्दपूर येथे आषाढी पौर्णिमेनिमित्त उसळला जनसागर : महानुभाव पंथाची काशी म्हणून आहे तीर्थक्षेत्राची ओळख

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७रिद्धपुर**

भगवान गोविंदप्रभू तथा सर्वज्ञ चक्रधर स्वामीच्या वास्तव्याने पावन झालेल्या या नगरीत आषाढी पौर्णिमेनिमित्त प्रसाद वंदनेकरिता तथा भव्य यात्रा महोत्सवाकरिता ६. जुलै, रविवार रोजी भक्तांच्या प्रसाद वंदनेकरिता गोविंद प्रभूच्या दर्शनासाठी जनसागर उसळला होता. आषाढी पौर्णिमेला दरवर्षी या ठिकाणी असलेल्या गोविंदप्रभू राजमठ, गोपिराज बाबा मठ, यादेव बाबामठ, वाईनदेशकर बाबा मठ, तळेगावकर बाबा मठ, भगतराराज बाबा मठ, दर्यापूकर बाबा मठ या मठांमध्ये पवित्र आस्था प्रसादाचे वंदन करण्यास हजारो भाविकभक्त येतात.

यात्रेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यवतमाळ, अमरावती, वर्धा, वाशिम, नांदेड,अकोला, हिंगोली आदी जिल्ह्यातील गवळी समाजाचे लोक या ठिकाणी येऊन रिद्धपूर क्षेत्राच्या आठ दिशेला असलेल्या श्री प्रभूच्या अष्टजया आठ तीर्थस्थाने अनवाणी पायाने आणि विश्रांती न घेता एका दिवसामध्ये त्याची परिक्रमा करतात, हे अतिशय कठीण आहे.परंतु परंपरेने हा गवळी समाज त्यांच्या घरातील एक सदस्य येऊन अत्यंत श्रद्धा भक्तीने आपला पण पूर्ण करतो जर हे केले नाही तर त्यांना समाधान वाटत नाही. आपल्या



पूर्वजांत्या अपेक्षाभंग नको म्हणून ते दरवर्षी हजारोच्या संख्येने येऊन श्री प्रभूच्या चरणी नतमस्तक होतात. आषाढी पौर्णिमेनिमित जवळपास हजारोंच्या संख्येने भाविकांनी प्रसाद वंदनेचा लाभ घेतला. यायात्रेत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी शिरखेड पोलिसस्टेशनचे ठाणेदार सचिन लुले यांनी पोलिसांचा बंदोबस्त लावला होता.

**प्रसाद वंदन काय आहे?**

प्रसाद म्हणजे परमेश्वराने प्रसन्न होऊन भक्तांना दिलेला तो प्रसाद होय यामध्ये प्रामुख्याने श्री चक्रधर स्वामी व श्री गोविंद प्रभूनी वापरलेलेवस्त्र, अंग्ररख्ये, धोतरशालतथात्यांच्या नित्य वापराच्या वस्तू इत्यादी त्या ८५० वर्षापासून पूर्वजांनी जतन करून ठेवल्या आहेत त्यांची जतन करण्याची पद्धत ही अत्यंत उत्कृष्ट आहे. पुठ्धावर कापसामध्ये अलगद त्या पवित्र वस्तूचे अवशेष ठेवून त्यावर सुंदर बारीक जाळी लावली जाते. त्यानंतर त्यास कव्हर लावून सुरक्षित पेटीमध्ये त्या प्रसाद वस्तूंना ठेवले जाते. अशा प्रकारे हा अनमोल ठेवा पूर्वजांनी जतन केला आहे. तो आषाढी पौर्णिमेनिमित्त भाविकांना वंदन करण्यास खुला करून दिला जातो. याकरिता दरवर्षी हजारो भाविक रिद्धपूर येथे दाखल होतात चार ते पाच तास दिवसभर रागेत उन्हातान्हात, पावसात उभे राहून त्या पवित्र प्रसादाचे वंदन करतात.

# बच्चू कडू दुटप्पी, कर्जमाफीचा आमचा संकल्प; बावनकुळेंची टीका



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नागपूर**

कर्जमाफीबाबत बच्चू कडूंची भूमिका दूटप्पीपणाची आहे, अशी टीका महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात माध्यमांशी बोलताना केली. बावनकुळे म्हणाले, मी आणि आमचे इतर मंत्री साडेचार तास मंत्रालयात बसलो आणि एकेक प्रश्नावर मार्ग काढला. विधानसभा अधिवेशन काळात सरकार समिती जाहीर करणार आहे. महाराष्ट्राचा दौरा करून ही समिती कर्जमाफी ज्यांना पाहिजे त्यांचे कर्ज माफी करणार. मी बच्चू कडूंना लेखी दिला आहे की, आपल्याला कर्जमाफी करायची आहे, आमचाही अजेंडा आहे. आम्ही निवडणुकीच्या काळात संकल्प केला आहे. सरकारने कबूल केले आहे. असे बावनकुळे म्हणाले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आर्थिक असमानतेकडे अलीकडे एका कार्यक्रमात लक्ष वेधले होते. त्याबाबत बावनकुळे म्हणाले, काही ठिकाणी आर्थिक दुर्बल व्यक्तीं आहेत. त्यांच्या पर्यंतना सरकार पोहोचायला पाहिजे. तिथे पोहोचत नाही, काही गोष्टी कमी पडत आहेत, मोदींनी सर्वांसाठी घर योजना केली. ही योजना सर्वांपर्यंत पोहोचले पाहिजे यासाठी काम करणे जरुरी आहे, आम्ही यावर सरकार आणि पार्टी म्हणून काम करतो आहे, एकही व्यक्ती कुठल्या योजनेपासून वंचित राहू नये खास करून महसूल विभागाने पुढाकार घेतला आहे आम्ही चांगल्या पद्धतीने काम करतो आहे.

## पावसाने शेतकरी समाधानी

पीक पाण्यासाठी आवश्यक असलेला पाऊस पडतोय, आतापर्यंत विदर्भ मराठवाडा किंवा महाराष्ट्रात पावसाने नुकसान होईल अशी परिस्थिती नाही जर काही नुकसान झाले तर सरकार मदत करते. खते तुटवडा – बी बियाणांच्या साठा आहे, अमरावती भंडारा चेक केला, काही लोक कृत्रिम तुटवडा निर्माण करीत आहे, काही ठिकाणी पुरवठा कमी आहे, पण सरकार तो पूर्ण करण्याकरगता काम करत आहे , असे बावनकुळे म्हणाले.

# पंढरपूरहून परतताना विठ्ठलाची कृपा एसटी बसला अपघात पण, २० भाविक बचावले



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ बुलढाणा**

एसटी महामंडळाच्या विशेष बसने पंढरपूर ला सुखरूप पोहोचले तिथे विठूमाउलीचे दर्शन घेतले तिथून आनंदात बुलढाण्यात परतले आणि घर जवळ आले असताना बसला अपघात झाला सोमवारी, ७ पहाटे बुलढाणा जिल्ह्यातील चिखली नजिक हा अपघात झाला. आषाढी वारीहून भाविकांना घेऊन परतणाऱ्या एसटी बसच्या चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस रस्ते दुभाजकाला (डिव्हायडरला) धडकून उलटली .

एम.एच. ४० वाय ५८३० क्रमांकाची ही एसटी बस चिखलीजवळील महाबीज प्रक्रिया केंद्राजवळ समोर आली असता हा अपघात झाला. सुदैवाने म्हणा की भाविकांच्या शब्दात सांगायचे झाल्यास विठ्ठलाच्या कृपेनें आशीर्वादाने प्राण हानी झाली नाही. मात्र कमिअधिक वीस प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. यामध्ये बुलढाणा जिल्ह्यासह अकोला जिल्ह्यातील भाविकांचा समावेश आहे.

बसमध्ये एकूण ५१ प्रवासी चालक आणि वाहक मिळून ५३ जण प्रवास करीत होते होता. या अपघातात कमिअधिक २०प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. सर्व जखमींना तात्काळ चिखली येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, रुग्णालयात आवश्यक त्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध नाही. यामुळे प्राथमिक उपचारानंतर १५जखमींना पुढील उपचारासाठी बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले.

यामध्ये भाऊसाहेब शोनाजी थांडे (वय ४५, रा. तळेगाव), पुष्पा विनोद शिंगणे (वय ३९, रा. तेल्हारा). प्रदीप रघुनाथ धर्मसकर (वय ४८, रा. दहीगाव). विठ्ठल तुलसीराम पांडे (वय ३७, रा. तळेगाव), रामप्रसाद हरिभाऊ पांडे (वय ६०, रा. तळेगाव), सुरेश दिगंबरराव फोकमारे (वय ६०, रा. सवदंरा), शोभा झोरे (वय ६०, रा. जानोरी रोड), गोविंद वासुदेव पांडे (वय ६०, रा. वडेगाव), तुकाराम पांडुरंग कोकरे (वय ६९, रा. बाळापूर), ईश्वर हरिचंद्र मोरे (वय ६५, रा. जवळा), रुख्मीना वसंत इंगळे (वय ६२, रा. बाळापूर), सुजाता राहुल वानखेडे (वय ३०, रा. चिखली), शिवाजी सुभाष जाधव (वय ३२, रा. अन्वा), नर्मदा अवचित मोरे (वय ४५, रा. मिराळवाडी, चिखली), आकाश अशोक डोके (वय ४५, रा. मंगरुळ–नवघरे) यांचा समावेश आहे.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा ८६०५९४८८५३

# मोर्शी नगरपालिका निवडणुकीचा बिगुल वाजला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मोर्शी**

नगरपरिषद निवडणुकीचे पडघम वाजले असून सोशल मीडियावर अनेक समस्या निवारण करण्याचे कार्य जोमाला लागले आहे. काही महिन्यांतच प्रभागरचना पूर्ण होताच नोव्हेंबरमध्ये निवडणूक होण्याची दाट शक्यता आहे. मात्र अद्याप नगराध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर न झाल्यामुळे जनता व सर्वच राजकीय पक्षाचे आरक्षणाकडे लक्ष लागले आहे. अलीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती लढणार असल्याने नेत्यांकडून असल्याचे समजते नगराध्यक्षपदासाठी महायुतीतील अनेक दावेदारांनी गुढघ्याला बाशिंग बांधले असून आरक्षणाची वाट पाहत आहे.

शहरातील सर्वच पक्षाकडून नगराध्यक्ष पदासाठी सक्षम उमेदवाराची चाचपणी सुरू झाली आहे. परंतु तिकीट कोणाला मिळते, हे मात्र कठीण झाले असून प्रत्येक पक्षाजवळ दोन ते तीन दावेदार असल्याचे दिसून येते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती लढणार?भावी उमेदवार उत्साहित आहे, तर काही जण आधीपासूनच बाशिंग बाधून तयार आहेत. नगरपरिषदेचे नगराध्यक्षपदाचे आरक्षण अजूनपर्यंत जाहीर झाले नाही. तरीही सर्वच पक्ष इच्छुक उमेदवाराला उमेदवारी मिळावी म्हणून वरिष्ठ नेत्याच्या संपर्कात आहेत. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (श. राष्ट्रवादी (अ.प.) शिवसेना (उबाठा) काँग्रेस आणि इतर पक्षाचे नेते योग्य उमेदवाराच्या शोधात असून यासाठी चाचपणी करीत आहेत.राष्ट्रवादी अजित पवार पक्षात काही मोजकेच नगराध्यक्षपदाच्या उमेदठारीच्या शर्यतीत असून तयारीला लागले आहेतः परतु भाजपमध्ये उमेदवारीबद्दल मोठा पेच निर्माण होऊ शकतो. अंतर्गत कलहामुळे कोणाला तिकीट मिळेल, हे सागणं शक्य नाही भाजपमाटो भाऊगर्दी पाहायला मिळते राष्ट्रवादी शरद पवार गटातही नगराध्यक्षपदाच्या निवडीसाठी उमेदवाराची चाचपणी सुरू आहे.विधानसभेत राष्ट्रवादी अजित पवार गट, राष्ट्रवादी शरद पवार गट यामध्ये भाजपला सर्वाधिक मत असल्यामुळे भाजपकडे उमेदवाराची गर्दी मोठ्याप्रमाणात पाहायलामिळते याआधी नगराध्यक्ष भाजपच्या शीलाताई रोडे निवडून आल्या होत्या. त्यानंतर त्यांचे निधन झाल्यामुळे पोटनिवडणूक झाली त्यावेळी राष्ट्रवादीच्या सौ. मेघना मडघे या निवडून आल्या. त्यानंतर आतापर्यंत प्रशासकीय कारभार आहे. निवडणुका अधिक रंगतदार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे सबळ उमेदवार कोणत्या पक्षावा आहे, हे सध्या सांगणे कठीण आहे. काही उमेदवारानी व्हॉट्सॲपचे गृप तयार करून समस्याबाबत जागृत राहण्याचे कार्य सुरू केले आहे व्हॉट्सॲपवर मेसेज टाकणे हा सुद्धा प्रचार यंत्रणेचा भाग असून सर्वजण आपापल्या परीने कामाला लागले आहे नगराध्यक्षपदासाठी अद्याप आरक्षण जाहीर झालेले नाही, पक्षाकडून तिकीट जाहीर करण्यात आलेले नाही मात्र असे असतानाही काही इच्छुकांना तर आतापासूनच उत्सुकता अनावर होऊ लागल्याचे दिसत आहे. या इच्छुकांची तयारी बघता त्यांना आतापासूनच नगराध्यक्षपदाचा ताप चढल्याचे बघावयास मिळत असून ते सध्या चर्चेचा विषय बनत आहे. मात्र पुढे काय मिशन आहे. हे मात्र अजूनही कोणी याबद्दल बोलत नाही, हे विशेष.

# वडाळी गार्डन व तलाव परिसराचा सर्वांगीण विकास; आधुनिक गार्डनसाठी आराखडा तयार

## आयुक्त सौम्या शर्मा चांडकशासनाकडे केली निधीची मागणी; लवकरच कामांना वेग



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज वडाळी गार्डन व तलाव परिसराची सखोल पाहणी करून परिसर स्वच्छ, सुरक्षित व पर्यावरणपूरक करण्यासाठी ठोस निर्देश दिले. यासोबतच गार्डनला आधुनिक रूप देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या नव्या आराखड्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. शहरातील हरित व नैसर्गिक ठिकाणांचे सुशोभीकरण व सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीने वडाळी परिसर हा महत्त्वाचा केंद्रबिंदू असून, नागरिकांना आरोग्यदायी व आकर्षक सार्वजनिक जागा मिळावी या हेतूने हा प्रकल्प हाती घेण्यात येत आहे.

**तलाव परिसरात सुधारणा**

तलावामधील पाणी स्वच्छ राखणे, प्लास्टिक व इतर कचऱ्यापासून संरक्षण करणे, वॉकिंग ट्रॅक तयार करणे, सुरक्षेसाठी रेलिंग बसविणे व प्रकाशयोजना सशक्त करणे यावर आयुक्तांनी भर दिला. यासाठी जनजागृतीसह नियोजनबद्ध उपाययोजना राबवण्याचे आदेशही त्यांनी दिले.

**आधुनिक गार्डनसाठी विशेष आराखडा**

महानगरपालिकेने गार्डनच्या नुतनीकरणासाठी तयार केलेल्या आधुनिक आराखड्यात पुढील गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे.या पाहणीवेळी शहर अभियंता रवींद्र पवार, सहायक आयुक्त नितीन बोबडे, प्रकल्प अभियंता राजेश आगरकर, प्रकाश विभागाचे उपअभियंता शरद तिनखडे, अभियंता चिन्मय देशपांडे, जेष्ठ स्वच्छता निरीक्षक कुंदन हडाले, स्वच्छता निरीक्षक व उद्यान विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.महानगरपालिकेच्या या पुढाकारामुळे वडाळी परिसराचा चेहरामोहरा बदलणार असून, लवकरच नागरिकांना एक सुशोभित, हरित आणि आधुनिक सार्वजनिक जागा मिळणार आहे.

**अश्या राहणार सोयी सुविधा**

ओपन जिम व योगा प्लॅटफॉर्मस्वच्छ व सुलभ टॉयलेट सुविधाआकर्षक प्रवेशद्वार व माहिती फलकनव्या फुलझाडांची व सावली देणाऱ्या वृक्षांची लागवडलहान मुलांसाठी खेळाचे साहित्य वरिष्ठ नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था

**शासनाकडे निधीची मागणी**

या आधुनिक गार्डन प्रकल्पासाठी आवश्यक निधीची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. निधी मंजूर होताच कामांना गती देण्यात येईल, असे आयुक्तांनी स्पष्ट केले. वडाळी गार्डन हे अमरावतीच्या हिरवळीत भर घालणारे आणि नागरिकांसाठी एक 'आयकॉनिक ग्रीन स्पेस' ठरेल, असा विश्वास आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी व्यक्त केला.

**नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा**

शहरातील प्रत्येक सार्वजनिक जागा ही नागरिकांची आहे. त्यांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि आनंदासाठी महापालिकेचे प्रयत्न सुरू आहेत. वडाळी गार्डनचा विकास करताना जनतेच्या सूचना, अपेक्षा आणि गरजा समजून घेऊनच काम केले जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

# सातबारा कोरा कोरा यात्रा म्हणजे स्वतःचे राजकारण जिवंत ठेवण्याची बच्चू कडूची धडपड - गोपाल तिरमारे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ चांदुर बाजार**



देशाचे पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव पापळ येथून प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष तथा माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली ७/१२ कोरा कोरा कोरा यात्रेला आजपासून सुरुवात झाली आहे. उंबरडा बाजार, मानकी, वळसा, तिवरी, तुपटाकळी, काळी दौलत, गुंज अशी गावे करत चिलगव्हाण या स्व. साहेबराव करपे यांच्या रणभूमीमध्ये या यात्रेची सांगता होणार आहे.

भर पावसात सुमारे १३८ किमीच्या या यात्रेला शेतकरी, पक्षातील कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली आहे. सरकारने ७/१२ कोरा केलाच पाहिजे अशी मार्गनि करीत शेतकरी मोठ्या संख्येने या यात्रेत सहभागी होत आहेत. मात्र ही सर्व यात्रा शेतकऱ्यांच्या नावावर राजकारण करून स्वतःचा झोरा भरणाऱ्यांना सातबारा कोरा याच्याशी काही देणं घेणं नाही.....

सातबारा कोरा कोरा यात्रा म्हणजे स्वतःचे राजकारण जिवंत ठेवण्याची बच्चू कडू यांची सुरू असलेली धडपड अशी टीका भाजपचे गोपाल तिरमारे यांनी केली आहे.

# आजपासून झेनिथ हॉस्पिटलमध्ये 'स्वस्थ हृदय सप्ताहा'चा शुभारंभ

## हृदय रोग प्रतिबंधासाठी विशेष हेल्थ पॅकेजची सुविधा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

अमरावतीतील प्रतिष्ठित झेनिथ हॉस्पिटलमध्ये आजपासून 'स्वस्थ हृदय सप्ताहा'ला सुरुवात झाली आहे. हृदयाशी संबंधित आजारांचे वाढते प्रमाण लक्षात घेता, ७ जुलै ते १२ जुलै दरम्यान हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या काळात हृदयविकाराच्या धोक्याचा वेळीच शोध घेता यावा आणि त्याची योग्य ती काळजी घेता यावी यासाठी नागरिकांसाठी फक्त २,५००/– मध्ये विशेष कॉम्प्लीट हार्ट चेकअप पॅकेज उपलब्ध करून देण्यात आले आहे, ज्याची मूळ किंमत ४,७५०/– आहे.



झेनिथ हॉस्पिटल प्रशासनाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, हे विशेष पॅकेज फक्त पहिल्या १०० नोंदणीकृत नागरिकांसाठीच उपलब्ध आहे. या पॅकेजमध्ये ECG, 2D-echo, TMT, लिपिड प्रोफाइल, ब्लड शुगर व डॉक्टरांची सल्ला सेवा अशा अत्यावश्यक तपासण्या समाविष्ट आहेत.तज्ज्ञ डॉक्टरांच्या मते, जर एखाद्या व्यक्तीस छातीत वेदना, श्वास घेण्यास त्रास, हृदयाचे ठोके वाढणे, जेवणानंतर ॲसिडिटी, खांदा किंवा जबड्यात वेदना, चक्कर येणे असे लक्षणे जाणवत असतील, तर ती हृदयविकाराची शक्यता दर्शवू शकतात आणि अशा वेळी तात्काळ तपासणी गरजेची असते.हॉस्पिटलकडून या उपक्रमाला जनतेमध्ये हृदय आरोग्याविषयी जागरूकता वाढविण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पाहिले जात आहे. नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी ९३२२८७७५१५ या क्रमांकावर संपर्क साधावा.सदर ची तपासणी झेनिथ हॉस्पिटल, वॉलकट कंपाउंड, अमरावती या ठिकाणी होणार आहे.